बुधवार दि. ०७ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## डॉक्टरांना संरक्षण हवेच; पण रुग्णांच्या तक्रारींचे काय?

### जनआरोग्य योजनेतील तक्रारी, अतिरिक्त पैशांची मागणी आणि रुग्णांच्या हक्कांबाबतही पारदर्शक यंत्रणेची गरज

**जालना**
**दीपक शेळके**

डॉक्टरांना धमक्या देणे, खंडणीसाठी दबाव आणणे, रुग्णालयात दमदाटी करणे किंवा सोशल मीडियावर कोणतीही पडताळणी न करता बदनामी करणे, हे निश्चितच गंभीर प्रकार आहेत. अशा प्रकारांपासून डॉक्टर, परिचारिका आणि अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. याबाबत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या जालना शाखेने पोलीस अधीक्षकांकडे केलेली मागणीही याच पार्श्वभूमीवर आहे.

मात्र, या मागणीसोबतच दुसरा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णाची फसवणूक, योजनेचा लाभ नाकारणे, अतिरिक्त पैसे मागणे किंवा बिलाबाबत वाद निर्माण झाल्यास सामान्य रुग्णाने दाद मागायची कुठे?

हा प्रश्न उपस्थित होण्याचे कारण म्हणजे रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक अनेकदा थेट पोलीस ठाण्यापेक्षा सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी किंवा पत्रकारांकडे धाव घेतात. कारण त्यांना आपली तक्रार तातडीने ऐकून घेतली जावी, अशी अपेक्षा असते. अशा प्रत्येक व्यक्तीला 'त्रयस्थ', 'अनधिकृत हस्तक्षेप करणारा' किंवा 'ब्लॅकमेलर' म्हणून पाहणेही तितकेच योग्य ठरणार नाही. त्याच वेळी, तक्रारीच्या नावाखाली दबाव, धमकी किंवा आर्थिक मागणी केली जात असल्यास त्यावरही कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे.

**मग रुग्णांच्या तक्रारींसाठी अधिकृत दार कुठे?**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये पात्र रुग्णांना रोखरहित उपचार देण्याची व्यवस्था आहे. जालना जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, या एकत्रित योजनेत पात्र लाभार्थ्यांना अंगीकृत शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये निवडक उपचारांसाठी रोखरहित सेवा उपलब्ध आहे आणि प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात लाभार्थ्यांच्या मदतीसाठी 'आरोग्यमित्र' नियुक्त असतात. योजनेच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार निवारणासाठी यंत्रणा आणि १५५३८८ हा टोल-फ्री क्रमांकही उपलब्ध आहे.

म्हणूनच रुग्णाला तक्रार असल्यास अधिकृत यंत्रणेकडे जाण्याचा मार्ग उपलब्ध असला, तरी ही यंत्रणा प्रत्यक्षात किती वेगाने आणि प्रभावीपणे काम करते? हा प्रश्नही प्रशासनाने तपासण्याची गरज आहे.

**'योजनेत उपचार' आणि 'खिशातून पैसे', तक्रारींची चौकशी किती?**

जनआरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेताना रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम आकारली गेल्याच्या तक्रारी राज्यभरातून समोर येत आहेत. मार्च २०२६ मध्ये विधानसभेत आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले होते की, योजनेंतर्गत रुग्णांकडून एक रुपयाही अतिरिक्त घेतल्याचे आढळल्यास कारवाई केली जाईल आणि वारंवार गैरप्रकार करणाऱ्या रुग्णालयांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही केली जाईल.

याच काळात राज्यात जनआरोग्य योजनांच्या अंमलबजावणीतील अनियमिततेच्या ३३८ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई झाल्याची माहितीही प्रसिद्ध झाली आहे.

म्हणजेच प्रश्न केवळ डॉक्टरांच्या सुरक्षेपुरता मर्यादित नाही. रुग्णाला योजनेचा मोफत लाभ मिळणे हा त्याचाही हक्क आहे. हा हक्क कुठे डावलला गेला, तर त्याची चौकशी आणि कारवाई होणे आवश्यक आहे.

**जालन्यातील 'चेक परत' प्रकरणाचा हिशेब कोण देणार?**

जालना जिल्ह्यात योजनेअंतर्गत उपचाराच्या नावाखाली रुग्णाकडून पैसे घेऊन नंतर ते चेकद्वारे परत केल्याचा प्रकार समोर आल्यास तो केवळ पैसे परत मिळाल्याने संपणारा विषय नाही. पैसे घेतलेच का? कोणत्या कारणासाठी घेतले? रुग्ण योजनेअंतर्गत पात्र होता का? उपचाराचा खर्च शासनाकडून मंजूर झाला होता का? रुग्णालयाने योजनेच्या नियमांचे उल्लंघन केले का? आणि संबंधित यंत्रणेने त्याची चौकशी करून काय कारवाई केली? या सर्व प्रश्नांची उत्तरे आवश्यक आहेत.

एखाद्या रुग्णाला पैसे परत मिळाले म्हणजे प्रकरण संपले, असे मानता येणार नाही. जर नियमभंग झाला असेल तर संबंधित रुग्णालयाविरुद्ध प्रशासकीय कारवाई, दंड, योजनेतील मान्यता निलंबित करणे किंवा लागू कायद्यानुसार पुढील कारवाई झाली का, याचा तपशीलही सार्वजनिक होणे गरजेचे आहे.

**जालन्यात डॉक्टरांविरुद्ध खंडणीचे किती गुन्हे? आकडेवारी सार्वजनिक करा**

ने डॉक्टरांना खंडणी, धमकी आणि ब्लॅकमेलिंगचे प्रकार होत असल्याचे पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. ५ ऑक्टोबरच्या निवेदनानंतर पोलिसांनी या तक्रारींची दखल घेतल्याचे वृत्तही प्रसिद्ध झाले आहे. पण आता या विषयाला आकडेवारीची जोड देण्याची गरज आहे. जालना जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत डॉक्टर, रुग्णालय किंवा वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून खंडणी, धमकी किंवा ब्लॅकमेलिंगबाबत किती दाखल झाले? त्यापैकी किती प्रकरणांत आरोपपत्र दाखल झाले? किती प्रकरणे तपासाधीन आहेत? किती आरोपींवर कारवाई झाली? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, ने निदर्शनास आणून दिलेल्या तक्रारींपैकी पोलिसांकडे प्रत्यक्ष किती गुन्हे नोंद झाले आहेत? या प्रश्नांची अधिकृत आकडेवारी जिल्हा पोलीस प्रशासनाने सार्वजनिक केल्यास डॉक्टरांच्या सुरक्षेच्या मागणीला वस्तुनिष्ठ आधार मिळेल.

**'त्रयस्थ' कोण? रुग्णाचा आवाज मांडणाऱ्यांनाही आरोपी ठरवणार का?**

रुग्णालयात एखाद्या रुग्णाला अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली तर तो अनेकदा स्वतःची बाजू मांडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार किंवा लोकप्रतिनिधींकडे जातो. हे भारतीय लोकशाही व्यवस्थेतील एक परिचित वास्तव आहे.

मात्र, या प्रक्रियेत काही व्यक्ती खरोखरच दबाव आणून आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. परंतु त्याच निकषाने खरी तक्रार घेऊन येणाऱ्या प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याला किंवा पत्रकाराला 'ब्लॅकमेलर' ठरवणेही धोकादायक ठरू शकते. म्हणूनच प्रश्न व्यक्तीचा नसून तक्रारीच्या सत्यतेचा आणि पुराव्याचा आहे.

तक्रार खरी असल्यास चौकशी व्हावी; खोटी असल्यास तक्रारदारावर कायदेशीर कारवाई व्हावी; आणि धमकी देऊन पैसे उकळण्याचा प्रकार असल्यास खंडणीचा गुन्हा दाखल व्हावा. या तीनही बाबींमध्ये समान कायदेशीर निकष असणे आवश्यक आहे.

**डॉक्टरांचे संरक्षण आणि रुग्णांचे संरक्षण, दोन्ही आवश्यक**

वैद्यकीय व्यवसायात काम करणाऱ्या डॉक्टरांना सुरक्षित वातावरण मिळणे ही मूलभूत गरज आहे. रुग्णालयात मारामारी, धमकी, तोडफोड किंवा खंडणीचा प्रकार घडल्यास त्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे.

पण दुसरीकडे रुग्णाला चुकीचे बिल लावले गेले, योजनेचा लाभ नाकारला गेला, अतिरिक्त पैसे मागितले गेले किंवा उपचाराबाबत गंभीर तक्रार असेल तर त्यालाही जलद, पारदर्शक आणि विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था मिळाली पाहिजे. (पान २ वर)

#### प्रशासनाने या प्रश्नांची उत्तरे द्यावीत

१. जालना जिल्ह्यात डॉक्टर किंवा रुग्णालयांकडून खंडणी, धमकी आणि ब्लॅकमेलिंगच्या किती तक्रारी प्राप्त झाल्या?
२. त्यापैकी किती प्रकरणांत दाखल झाले?
३. किती प्रकरणांत आरोपपत्र दाखल झाले आणि किती प्रकरणे तपासाधीन आहेत?
४. MJPJAY/आयुष्मान योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याच्या किती तक्रारी आल्या?
५. त्या तक्रारींपैकी किती रुग्णालयांवर दंड, योजना निलंबन किंवा अन्य प्रशासकीय कारवाई झाली?
६. रुग्णांकडून पैसे घेऊन नंतर चेक किंवा रोख स्वरूपात परत करण्याच्या तक्रारींची संख्या किती?
७. अशा प्रकरणांत केवळ पैसे परत करण्यात आले की नियमभंगाबाबत स्वतंत्र कारवाईही करण्यात आली?
८. जालना जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयांची आणि त्यांच्याविरुद्ध झालेल्या कारवाईची अद्ययावत माहिती सार्वजनिक करण्यात येणार का?

#### संरक्षणासोबत उत्तरदायित्वही हवे

डॉक्टरांवर होणाऱ्या धमक्या, खंडणी किंवा ब्लॅकमेलिंगचे समर्थन होऊ शकत नाही. त्यांच्यावर गुन्हा झाला तर तातडीने कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे. पण त्याचवेळी रुग्णांच्या तक्रारींना 'हस्तक्षेप' किंवा 'ब्लॅकमेलिंग' म्हणून सरसकट नाकारले जाऊ नये. डॉक्टरांना भयमुक्त वातावरण आणि रुग्णांना पारदर्शक न्याय, ही दोन्ही लोकशाही व्यवस्थेचीच गरज आहे. जालना पोलिसांनी डॉक्टरांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारली आहे; आता आरोग्य विभागानेही जनआरोग्य योजनांतील तक्रारी, रुग्णांकडून घेतले जाणारे अतिरिक्त पैसे आणि संबंधित रुग्णालयांवरील कारवाईची जिल्हानिहाय, रुग्णालयनिहाय आणि प्रकरणनिहाय पारदर्शक माहिती समोर ठेवण्याची गरज आहे. कारण प्रश्न फक्त 'डॉक्टरांना कोण धमकावत आहे?' एवढाच नाही. प्रश्न हा देखील आहे. 'रुग्णाची तक्रार खरी असेल तर त्याला न्याय कोण देणार?'

## शुल्कमाफीच्या शासन निर्णयाला जेईएस महाविद्यालयाकडून केराची टोपली?

### विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसुलीचा प्रयत्न; अभाविपच्या आक्रमक भूमिकेनंतर शुल्क घेणे तात्पुरते थांबवले

**जालना | प्रतिनिधी**

दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून दिलासा देण्याचा शासनाने निर्णय घेतला असतानाही जालना येथील महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे. शासनाचा निर्णय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शुल्कमाफीसंदर्भातील आदेश लागू असतानाही शुल्कवसुली केली जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे अभाविपने म्हटले आहे.

दुष्काळी परिस्थितीचा आर्थिक फटका विद्यार्थ्यांच्या कुटुंबांनाही बसत असल्याने शासनाने राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या कार्यक्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणे अपेक्षित आहे.



मात्र, जालन्यातील महाविद्यालयात परीक्षा शुल्क आकारले जात असल्याची माहिती समोर आल्यानंतर अभाविपने याविरोधात आक्रमक भूमिका घेतली.

या प्रकाराची दखल घेत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जालना शाखेच्या कार्यकर्त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांची भेट घेतली. शासनाचा निर्णय आणि विद्यापीठाच्या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करून पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, अशी मागणी करणारे निवेदन प्राचार्यांना देण्यात आले.

विद्यार्थ्यांना शासनाने दिलेला आर्थिक दिलासा महाविद्यालयीन पातळीवर रोखला जाऊ नये. शासनाचा निर्णय केवळ कागदावर न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक असल्याचे अभाविपने यावेळी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर अभाविपच्या कार्यकर्त्यांनी ठाम भूमिका घेतल्यानंतर महाविद्यालय (पान २ वर)

## जालन्याचा ओमकार वाघ महाराष्ट्राच्या अंडर-१९ संघात

**जालना | प्रतिनिधी**



जालना जिल्ह्याच्या क्रिकेट क्षेत्रासाठी अभिमानाची बातमी समोर आली असून, अंबड तालुक्यातील युवा वेगवान गोलंदाज ओमकार वाघ याची महाराष्ट्राच्या अंडर-१९ क्रिकेट संघात निवड झाली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या () विनू मांकड ट्रॉफी स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या संघात ओमकारची गोलंदाज म्हणून निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागातून आलेल्या या युवा खेळाडूने सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर राज्याच्या क्रिकेट संघात स्थान मिळवत जालन्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. ओमकार वाघ हा जालना येथील साई काने क्रिकेट अकॅडमीमध्ये (पान २ वर)

## नियम पाळण्याची तयारी, साऊंड सिस्टीमला परवानगी द्या; नकाराचे लेखी कारण द्या

### *डॉ. बाबासाहेब आंबेडकर साऊंड लाईट संघटनेचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन; व्यवसायावर निर्बंध आल्यास रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची भीती*

**जालना | प्रतिनिधी**

ध्वनी प्रदूषण कायदा २००० मधील विहित अटी व नियमांचे पालन करून, शासनाने निश्चित केलेल्या डेसीबल मर्यादेत साऊंड सिस्टीम चालविण्यास परवानगी द्यावी. कायद्याचे पालन करण्याची तयारी असताना सरसकट परवानगी नाकारू नये आणि परवानगी नाकारण्यात येत असल्यास त्याचे नेमके कारण लेखी स्वरूपात द्यावे, अशी मागणी श्रमीक महासंघ संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर साऊंड लाईट



संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना निवेदन सादर केले.

जालना शहरासह जिल्ह्यातील अनेक साऊंड सिस्टीम चालक व मालकांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टीम, लाईट, जनरेटर आणि मंडप साहित्य उपलब्ध करून देण्याचे काम अनेक व्यावसायिक करतात. या व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करावी लागते. अनेक व्यावसायिकांनी साहित्य खरेदी करण्यासाठी बँकांकडून कर्ज घेतले असून, त्याचे मासिक हप्ते सुरू असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

**व्यवसायावर निर्बंध आल्यास रोजगाराचा प्रश्न**

साऊंड सिस्टीम व्यवसाय केवळ चालक-मालकांपुरता मर्यादित नसून त्यावर तंत्रज्ञ, कामगार, वाहतूक करणारे कर्मचारी आणि इतर संबंधित व्यक्तींचे रोजगार अवलंबून आहेत. त्यामुळे साऊंड सिस्टीमच्या वापरावर सरसकट निर्बंध किंवा परवानगी नाकारल्यास या संपूर्ण व्यवसायाशी संबंधित कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

व्यावसायिकांनी लाखो रुपयांची गुंतवणूक करून साऊंड सिस्टीम, स्पीकर्स, ॲम्प्लिफायर, लाईटिंग साहित्य, जनरेटर तसेच अन्य साहित्य खरेदी केले आहे. या गुंतवणुकीसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते (पान २ वर)

## डॉ. गोविंद भताने यांची भाजपा युवा मोर्चा जालना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी डॉ. गोविंद नागनाथ भताने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. सदरील नियुक्ती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे दादा, माजी मंत्री तथा आमदार श्री. बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच ग्रामीण जालना जिल्हाध्यक्ष आमदार श्री. नारायण कुचे, आमदार



श्री. संतोष पाटील दानवे, माजी आमदार श्री. कैलास गोरंट्याल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे आणि भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. कृष्णराज महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

डॉ. गोविंद भताने यांनी यापूर्वी भाजपा वैद्यकीय सेलच्या माध्यमातून पक्षसंघटना, आरोग्यसेवा आणि सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्य केले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव तसेच सामाजिक व संघटनात्मक कार्याची पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांच्यावर युवा मोर्चाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

**युवक संघटन, व्यसनमुक्ती आणि आरोग्य जनजागृतीवर भर**

युवा मोर्चाच्या माध्यमातून (पान २ वर)

# संपादकीय...

## बुलडोझर फिरला; आता पुन्हा अतिक्रमण होऊ नये!

जालनावाटूर आणि छत्रपती संभाजीनगरजालना या दोन महत्त्वाच्या महामार्गांवरील अतिक्रमणांवर प्रशासनाने बुलडोझर चालविला. विरेगाव, चितळपुतळी फाटा, बदनापूर आणि शेलगाव या ठिकाणी महामार्गाच्या हद्दीत झालेली अतिक्रमणे हटविण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन आणि टोलवेज यंत्रणेच्या समन्वयातून झालेली ही कारवाई वाहतुकीची सुरक्षितता आणि रस्त्याची उपलब्ध जागा कायम ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यकच आहे. पण या कारवाईचे स्वागत करतानाच एक मूलभूत प्रश्न उपस्थित करणेही तितकेच आवश्यक आहेही अतिक्रमणे एका रात्रीत उभी राहिली होती का? महामार्गाच्या हद्दीत दुकान, शेड, बांधकाम किंवा अन्य स्वरूपाचे अतिक्रमण उभे राहत असताना संबंधित यंत्रणेला त्याची माहिती मिळत नव्हती का? अतिक्रमण उभे राहिल्यानंतर ते हटविण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त, यंत्रसामग्री आणि प्रशासकीय यंत्रणा रस्त्यावर आणावी लागते; मग त्याआधीच प्रतिबंधात्मक कारवाई का झाली नाही? हा प्रश्न केवळ या चार ठिकाणांपुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण अतिक्रमण नियंत्रण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी संबंधित आहे.

महामार्ग म्हणजे केवळ डांबरी रस्ता नव्हे. त्याची निश्चित हद्द, रस्त्याची रुंदी, कडेला असलेली जागा, सुरक्षित अंतर आणि वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक मोकळी जागा या सर्व बाबी नियोजनाचा भाग असतात. या जागेत अतिक्रमण वाढले की त्याचा परिणाम थेट वाहनचालकांच्या सुरक्षिततेवर होतो.

विशेषतः फाटे, गावालगतचे भाग आणि वर्दळीच्या ठिकाणी महामार्गाच्या कडेला दुकाने किंवा अनधिकृत बांधकामे उभी राहिल्यास वाहनचालकांना अचानक ब्रेक लावणे, वळणे किंवा रस्त्याच्या मध्यभागी येणे भाग पडू शकते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. म्हणूनच अतिक्रमण झाल्यानंतर बुलडोझर चालविण्यापेक्षा अतिक्रमण होण्यापूर्वीच ते रोखणे अधिक परिणामकारक प्रशासनाचे लक्षण आहे. आज अतिक्रमण हटले. उद्या पुन्हा त्याच जागी पत्र्याचे शेड उभे राहिले तर? काही दिवसांनी दुकान सुरू झाले तर? पुन्हा फेरीवाले किंवा अन्य स्वरूपाचे अतिक्रमण झाले तर?

**हा प्रश्न महत्त्वाचा आहे.**

अतिक्रमण हटविण्याची कारवाई ही अंतिम टप्पा नसून सततच्या देखरेखीची सुरुवात असायला हवी. महामार्गाच्या हद्दीचे डिजिटायझेशन, सीमांकन, नियमित पाहणी आणि अतिक्रमण दिसताच तत्काळ नोटीस व कारवाईअशी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. अन्यथा काही महिन्यांनी पुन्हा त्याच ठिकाणी बुलडोझर आणण्याची वेळ येईल आणि प्रशासनाची कारवाई ही 'उपचार' न राहता 'पुनरावृत्तीचा कार्यक्रम' बनेल. अतिक्रमण हटविताना आणखी एक बाजू दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला छोटी दुकाने, हातगाड्या किंवा शेडच्या माध्यमातून काही कुटुंबांची उपजीविका चालत असते. महामार्गाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिक्रमण हटविणे आवश्यक असले, तरी संबंधितांना कायदेशीर पर्याय किंवा पुनर्वसनाची शक्यता आहे का, याचाही प्रशासनाने विचार करायला हवा. सार्वजनिक सुरक्षितता आणि गरीबांच्या उपजीविकेचा प्रश्न हे एकमेकांचे विरोधक बनविण्याची गरज नाही. महामार्ग मोकळा ठेवायचा असेल तर नियोजित जागी अधिकृत व्यावसायिक व्यवस्था, स्थानिक विक्रेत्यांसाठी पर्यायी जागा आणि स्पष्ट नियम यांचा विचार करता येऊ शकतो. कायदेशीर परवानगी असलेले आणि महामार्गाच्या सुरक्षिततेला बाधा न आणणारे व्यवहार आणि बेकायदेशीर अतिक्रमण यांच्यात स्पष्ट फरक करणेही आवश्यक आहे. प्रशासनाने ही कारवाई सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने केल्याचे सांगितले आहे. न्यायालयीन निर्देशांची अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जबाबदारीच आहे. मात्र, कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करताना त्याचा नेमका व्याप्ती, संबंधित महामार्गाची हद्द आणि कायदेशीर प्रक्रिया यांचे काटेकोर पालन होणे तितकेच आवश्यक आहे. कारवाई पारदर्शक असावी. कोणते बांधकाम महामार्गाच्या हद्दीत येते, त्याचे सीमांकन कसे झाले, संबंधितांना कोणत्या नोटिसा देण्यात आल्या आणि कारवाई कोणत्या कायदेशीर तरतुदींनुसार झालीया बाबींची नोंद सार्वजनिक व्यवस्थेत स्पष्ट असणे गरजेचे आहे.

अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमांमध्ये अनेकदा कारवाई झाली की बातमी संपते. पण खरी चौकशी तिथून सुरू झाली पाहिजे. अतिक्रमण उभे राहिले कसे? महामार्गाच्या हद्दीचे सीमांकन कोणत्या वेळी झाले होते? अतिक्रमणाची पहिली नोंद कधी झाली? नोटीस कधी देण्यात आली? कारवाईला विलंब का झाला? दरम्यान अतिक्रमण वाढत असताना संबंधित यंत्रणांनी काय केले? आणि भविष्यात पुन्हा अतिक्रमण झाल्यास जबाबदारी कोणाची? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच अतिक्रमणविरोधी कारवाईचा खरा उद्देश साध्य होईल. जालना जिल्ह्यातील प्रमुख महामार्गांवर दररोज हजारो वाहने धावत असतात. त्यामुळे रस्त्याची सुरक्षितता ही केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी नाही; ती प्रशासन, पोलीस, टोलवेज व्यवस्थापन आणि स्थानिक यंत्रणांची संयुक्त जबाबदारी आहे. महामार्गाच्या हद्दीचे नियमित सर्वेक्षण, अतिक्रमणांची डिजिटल नोंद, जीपीएस आधारित निरीक्षण, छायाचित्रांसह पंचनामा आणि कारवाईनंतर पुन्हा तपासणी अशा उपाययोजना केल्या तर 'अतिक्रमण हटवा आणि पुन्हा विसरा' या पद्धतीला आळा बसेल. विरेगाव, चितळपुतळी फाटा, बदनापूर आणि शेलगाव येथे प्रशासनाने अतिक्रमणे हटविली. त्यामुळे रस्ता मोकळा झाला, वाहतुकीला दिलासा मिळाला आणि प्रशासनाची कारवाई दिसून आली. पण खरी परीक्षा आता सुरू झाली आहे. या जागांवर पुन्हा अतिक्रमण होऊ न देणे, महामार्गाच्या हद्दीचे संरक्षण करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे. ही पुढची जबाबदारी प्रशासनाची आहे. बुलडोझर चालविणे ही कारवाई आहे; अतिक्रमण पुन्हा उभे राहू न देणे हे सुशासन आहे. जालना जिल्ह्यातील महामार्ग सुरक्षित, मोकळे आणि अडथळामुक्त ठेवायचे असतील, तर अधूनमधून होणाऱ्या धडक मोहिमांपेक्षा कायमस्वरूपी देखरेखीची यंत्रणा उभी करणे हीच काळाची गरज आहे.

# वाळू तस्करावर MPDAची कारवाई; एक वर्षासाठी स्थानबद्ध

## गोंदी पोलिसांची धडक कारवाई; जीवघेणा हल्ला, वाळू चोरी, धमकी व मारहाणीचे गुन्हे दाखल असल्याचा पोलिसांचा दावा

**जालना | प्रतिनिधी**

अवैध वाळू तस्करीसह शरीराविरुद्धच्या विविध गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याचा आरोप असलेल्या गोंदी येथील संतोष सखाराम कांबळे (वय ३०) याच्यावर गोंदी पोलिसांनी महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ ( ) च्या कलम ३(१) अन्वये स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. जिल्हादंडाधिकारी, जालना यांनी १ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानबद्धतेच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर कांबळे याला एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले आहे.

पान १ व ४ वरुन...

### डॉक्टरांना संरक्षण...

राज्य सरकारने जनआरोग्य योजनांच्या अंमलबजावणीतील तक्रारींच्या चौकशीसाठी कठोर पावले उचलण्याची भूमिका घेतली आहे. २०२६ मध्ये संशयास्पद जनआरोग्य दाव्यांच्या मोठ्या संख्येच्या चौकशीसाठी विशेष तपास पथकाच्या कारवाईची घोषणाही करण्यात आली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातही आता 'डॉक्टरांना संरक्षण' आणि 'रुग्णांना न्याय' या दोन्ही मुद्द्यांवर समान पारदर्शकता अपेक्षित आहे.

### शुल्कमाफीच्या शासन...

प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात परीक्षा शुल्क घेणे थांबविल्याचे अभाविपकडून सांगण्यात आले. यानंतर प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी अभाविपच्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली.

शुल्क आकारणीबाबत योग्य तो बदल करण्यात येईल आणि येत्या एक दिवसात यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे महाविद्यालय प्रशासनाकडून सांगण्यात आल्याचा दावा अभाविपने केला आहे. मात्र, केवळ तोंडी आश्वासनावर समाधान मानणार नसल्याची भूमिका अभाविपने घेतली आहे. शासन आणि विद्यापीठाच्या निर्णयाची अधिकृत व पारदर्शक अंमलबजावणी होऊन पात्र विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जाणार नाही, याची स्पष्टता महाविद्यालय प्रशासनाने द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून दिलासा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर महाविद्यालयाकडून शुल्क आकारण्याचा प्रयत्न नेमका कुणाच्या आदेशाने करण्यात आला, असा सवाल अभाविपने उपस्थित केला आहे.

दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, या उद्देशाने शासनाने निर्णय घेतला असल्याचे अभाविपने म्हटले आहे. त्यामुळे संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महाविद्यालय प्रशासनाची असल्याचेही संघटनेने स्पष्ट केले.

शुल्कमाफीच्या निर्णयाची तातडीने, पारदर्शक आणि पूर्ण अंमलबजावणी करावी. पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाऊ नये तसेच यापूर्वी शुल्क घेतले असल्यास त्याबाबतही योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी अभाविपने केली आहे.

या मागणीची अंमलबजावणी झाली नाही किंवा विद्यार्थ्यांकडून पुन्हा शुल्कवसुली सुरू झाली, तर विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अभाविपचे शहर मंत्री अभिषेक खंडेकर यांनी दिला. ''विद्यार्थ्यांच्या हक्कावर गदा आली तर अभाविप शांत बसणार नाही,'' असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शासनाचा निर्णय आणि विद्यापीठाच्या आदेशानुसार पात्र विद्यार्थ्यांना शुल्कमाफीचा लाभ प्रत्यक्ष मिळतो की नाही, याकडे आता विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. महाविद्यालय प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार शुल्क आकारणीच्या प्रक्रियेत बदल झाल्यास विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, याबाबत अधिकृत आणि स्पष्ट निर्णय होणे आवश्यक असल्याची भूमिका अभाविपने घेतली आहे.

या आंदोलनात जिल्हा संयोजक गणेश बोंड, सहसंयोजक अजित उबाळे, शहर मंत्री अभिषेक खंडेकर, शिवराज उपाध्याय, शुभम पाटील यांच्यासह विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जालन्याचा ओमकार...

नियमित सराव करतो. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन तसेच जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना चे सचिव राजू काने सर यांच्या मार्गदर्शनाखाली ओमकारने आपल्या गोलंदाजीवर सातत्याने मेहनत घेतली. सरावातील शिस्त, तांत्रिक बारकावे, फिटनेस आणि सामन्यातील परिस्थितीनुसार गोलंदाजी करण्याची क्षमता यावर त्याने विशेष भर दिला. या मेहनतीचे फलित आता महाराष्ट्राच्या अंडर-१९ संघातील निवडीच्या रूपाने मिळाले आहे.

काने सरांच्या मार्गदर्शनाखाली ४५ हून अधिक खेळाडूंची राज्यस्तरीय भरारी

साई काने क्रिकेट अकॅडमी आणि राजू काने यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेटचे धडे घेतलेल्या अनेक खेळाडूंनी महाराष्ट्राच्या विविध वयोगटातील संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. आतापर्यंत ४५ हून अधिक खेळाडूंनी महाराष्ट्राच्या विविध वयोगटातील संघात स्थान मिळविले असल्याचे सांगण्यात येते.

या यशस्वी परंपरेत आता ओमकार वाघच्या नावाची भर पडली आहे. त्यामुळे त्याची निवड ही केवळ एका खेळाडूचे वैयक्तिक यश न राहता जालना जिल्ह्यातील क्रिकेट प्रशिक्षणाच्या वाढत्या दर्जाचेही प्रतीक मानली जात आहे.

**ग्रामीण भागातून महाराष्ट्राच्या जर्सीपर्यंतचा प्रवास**

अंबड तालुक्यातील ओमकार वाघने आपल्या क्रिकेट प्रवासातून ग्रामीण भागातील खेळाडूंमध्येही मोठी क्षमता असल्याचे दाखवून दिले आहे. मर्यादित साधनसुविधांच्या पार्श्वभूमीवर सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळाल्यास राज्यस्तरावर संधी निर्माण करता येते, हे ओमकारच्या निवडीने अधोरेखित झाले आहे.

वेगवान गोलंदाजीसाठी आवश्यक असलेला फिटनेस, वेग, अचूक टप्प्यावर चेंडू टाकण्याची क्षमता आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्याने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्राच्या अंडर-१९ संघात स्थान मिळाल्याने आता राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी ओमकारला मिळणार आहे.

**विनू मांकड ट्रॉफीच्या माध्यमातून मोठी संधी**

बीसीसीआयच्या वयोगटातील क्रिकेट स्पर्धांमध्ये विनू मांकड ट्रॉफीला विशेष महत्त्व आहे. अंडर-१९ स्तरावरील खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी या स्पर्धेचे व्यासपीठ मिळते. महाराष्ट्राच्या संघातून ओमकारला या स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाल्याने त्याच्या पुढील क्रिकेट कारकिर्दीसाठी ही महत्त्वाची पायरी ठरणार आहे.

राज्याच्या संघाची जर्सी परिधान करून मैदानात उतरणाऱ्या ओमकारकडून जालना जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींना आता दमदार कामगिरीची अपेक्षा आहे. त्याच्या निवडीमुळे जालना जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंमध्येही उत्साह निर्माण झाला आहे.

**जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून अभिनंदन**

ओमकार वाघच्या निवडीबद्दल जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना तसेच साई काने क्रिकेट अकॅडमीशी संबंधित पदाधिकारी, प्रशिक्षक आणि क्रिकेटप्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे. त्याच्या पुढील क्रिकेट वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, रमेश मगरे, दिलीप शहा, ॲड. श्रीकांत देशपांडे, ॲड. सौरभ नाईक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन तसेच जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव राजू काने, अभिजीत चव्हाण, संतोष भारोटे, संदीप पाटील आदींनी ओमकारचे अभिनंदन केले.

तसेच जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, माजी खासदार रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, राजेश भैय्या टोपे, कैलासजी गोरंट्याल, बाबनराव लोणीकर, भास्कर आबा दानवे, भास्करराव आंबेकर, विष्णू पाचफुळे, राहुल लोणीकर तसेच जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी ओमकार वाघचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**'जालन्याच्या क्रिकेटला नवी ओळख'**

ओमकार वाघची महाराष्ट्राच्या अंडर-१९ संघात झालेली निवड जालना जिल्ह्याच्या क्रिकेट प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. काने सरांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या ४५ हून अधिक खेळाडूंनी महाराष्ट्राच्या विविध वयोगटांमध्ये प्रतिनिधित्व केले आहे. आता त्याच यशस्वी परंपरेत ओमकारने प्रवेश केला आहे.

जालना शहर आणि ग्रामीण भागातील प्रतिभावान क्रिकेटपटूंना योग्य प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास ते राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडू शकतात, याचे ओमकार वाघ हे आणखी एक उदाहरण ठरले आहे. महाराष्ट्राच्या अंडर-१९ संघातील त्याची निवड ही जालना जिल्ह्यातील क्रिकेटविश्वासाठी निश्चितच अभिमानाची बाब असून, त्याच्या पुढील कामगिरीकडे जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### नियम पाळण्याची...

नियमितपणे भरावे लागत आहेत. व्यवसायाला परवानगी न मिळाल्यास कर्जाचे हप्ते फेडणे आणि कुटुंबाचा खर्च भागवणे कठीण होणार असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**'नियम पाळण्यास तयार, मग परवानगी का नाकारता?'**

ध्वनी प्रदूषण कायदा २००० आणि प्रशासनाने निश्चित केलेल्या ध्वनी मर्यादांचे पालन करण्याची पूर्ण तयारी साऊंड सिस्टीम चालक व मालकांनी दर्शविली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून व्यवसाय करण्यास आम्ही तयार असताना सर्वांनाच सरसकट परवानगी नाकारणे योग्य नाही, अशी भूमिका संघटनेने निवेदनातून मांडली.

साऊंड सिस्टीम वापरताना निर्धारित डेसीबल मर्यादा, वेळेची बंधने आणि प्रशासनाने घालून दिलेल्या अन्य अटींचे पालन करण्याची तयारी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यास संघटनेचा विरोध नसून, नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना कायदेशीर पद्धतीने व्यवसाय करण्याची संधी मिळावी, अशी मागणी आहे.

**'कोर्टाच्या आदेशामुळे बंदी' सांगितल्याचा दावा**

पोलीस प्रशासनाकडे साऊंड सिस्टीम वापरण्याची परवानगी मागण्यासाठी गेल्यानंतर काही प्रसंगी 'कोर्टाच्या आदेशामुळे साऊंड सिस्टीमला बंदी आहे', असे सांगितले जात असल्याचा दावा संघटनेने निवेदनात केला आहे.

यामुळे नेमका कोणता न्यायालयीन आदेश, कोणती कायदेशीर तरतूद किंवा कोणत्या प्रशासकीय निर्णयाच्या आधारे परवानगी नाकारली जात आहे, याची स्पष्ट माहिती संबंधित व्यावसायिकांना देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. परवानगी नाकारायची असल्यास त्यामागील कारण संबंधितांना लेखी स्वरूपात देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**कायद्याच्या चौकटीत सकारात्मक निर्णयाची मागणी**

ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी लागू असलेल्या कायद्यांचा आणि न्यायालयीन निर्देशांचा आदर राखत साऊंड सिस्टीम व्यवसायाला आवश्यक त्या अटी व नियमांसह परवानगी देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ध्वनीची मर्यादा, वेळेची बंधने आणि परिसरातील नागरिकांना होणारा त्रास याबाबत प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी साऊंड सिस्टीम चालकांची असल्याचेही संघटनेने मान्य केले आहे. मात्र, नियमांचे पालन करण्यास तयार असलेल्या व्यावसायिकांना कायदेशीर मार्गाने व्यवसाय करण्याची संधी मिळावी, अशी संघटनेची भूमिका आहे.

**लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा**

साऊंड सिस्टीम व्यवसायावर अवलंबून असलेल्या चालक-मालकांच्या रोजगाराचा प्रश्न लक्षात घेऊन प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत निर्णय घ्यावा. नियमांचे पालन करण्यास तयार असलेल्या व्यावसायिकांना परवानगी देण्यात यावी आणि परवानगी नाकारल्यास त्यामागील कारण स्पष्टपणे लेखी देण्यात यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास आपल्या हक्कांसाठी लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने न्याय मागावा लागेल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी सुनिल प्रकाश गायकवाड, सोनू भालेराव, दीपक भानुसे, कृष्णा कोल्हे, राम शेजुळ, रवि खुपसे यांच्यासह जालना शहरातील अनेक साऊंड सर्व्हिस चालक व मालक उपस्थित होते.

### डॉ. गोविंद भताने...

'Gen-Z – Drugs Free Bharat, Viksit Bharat या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून जालना जिल्ह्यातील युवकांमध्ये व्यसनमुक्ती, आरोग्य जनजागृती, सामाजिक जबाबदारी, राष्ट्रनिर्माण आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. युवकांना सामाजिक कार्य, जनसेवा आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर राहणार आहे.

आरोग्य क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग करून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आरोग्य शिबिरे, आरोग्य तपासणी अभियान, व्यसनमुक्ती जनजागृती, मौखिक आरोग्य जनजागृती आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे डॉ. भताने यांनी सांगितले. च्या माध्यमातून त्यांचे आरोग्यसेवा, सामाजिक सेवा आणि जनजागृतीचे विविध उपक्रम सुरू आहेत. या कार्याची भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी प्रशंसा केल्याचेही डॉ. भताने यांनी सांगितले.

''जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना भाजपा संघटनेशी जोडणे, त्यांना नेतृत्वाची व सामाजिक कार्याची संधी उपलब्ध करून देणे आणि युवकांच्या माध्यमातून जनसेवेचे उपक्रम प्रभावीपणे राबविणे, ही माझी प्रमुख प्राथमिकता असेल. पक्षसंघटना मजबूत करण्यासोबतच व्यसनमुक्ती, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक सेवा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील,'' असे डॉ. गोविंद भताने यांनी सांगितले.

आगामी काळात युवा शक्ती, आरोग्य, व्यसनमुक्ती, सामाजिक सेवा आणि संघटन विस्तार या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून जालना जिल्ह्यातील युवकांना सक्रियपणे संघटित करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

डॉ. गोविंद भताने यांच्या नियुक्तीबद्दल भाजपा पदाधिकारी, युवा कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### बदनापूर IIMSRमध्ये...

मादरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते केंद्राचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला माता, बालके, आरोग्य कर्मचारी, शिक्षक तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**विविध विभागांचा संयुक्त उपक्रम**

या उपक्रमासाठी च्या तसेच या विभागांनी संयुक्तपणे पुढाकार घेतला आहे.

कार्यक्रमास चे अधिष्ठाता डॉ. अझहर सिद्दीकी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इलियास बेमत, नूर हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. इशरत फातिमा, बालरोग विभागप्रमुख डॉ. ललित उणे, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वाती नागापूरकर तसेच लिना आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**रुग्णसेवा आणि समुदाय आरोग्यसेवेशी जोडणार**

पूरक आहाराबाबतचे समुपदेशन आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके नियमित रुग्णसेवा तसेच समुदायस्तरीय आरोग्यसेवेचा भाग बनविण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. बालकांच्या योग्य पोषणाबाबत कुटुंबांना सातत्यपूर्ण आणि प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा या केंद्रामागील प्रमुख उद्देश आहे.

ग्रामीण भागातील माता व कुटुंबीयांना स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या पौष्टिक पदार्थांचा योग्य वापर, बालकांच्या वयानुसार आहाराचे नियोजन आणि पूरक आहाराची योग्य पद्धत याबाबत मार्गदर्शन मिळणार असल्याने या उपक्रमाचा बालपोषणाच्या दृष्टीने उपयोग होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### जालन्याच्या ...

जिल्ह्यासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. विज्ञान, संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात जालना येथील संशोधकाने राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित पुरस्कार मिळविल्याने शैक्षणिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय संशोधन कार्याची दखल घेत 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान व तंत्रज्ञान पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल शैक्षणिक, संशोधन आणि विज्ञान क्षेत्रातून डॉ. गावंडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### मॅजिक-आयटीआय...

सहाय्य देण्यात आले आहे. मॅजिकचे संचालक रितेश मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'आयडिया टू इन्कम टॅक्स' ही संकल्पना स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना मॅजिककडे मांडाव्यात आणि त्या कल्पनेचे व्यवसायात रूपांतर होईपर्यंत मार्गदर्शन, मेंटरिंग व आवश्यक सहकार्य देण्याचा मॅजिकचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांसाठी प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, इंडस्ट्रियल हाऊसकीपिंग आणि वेल्डिंग या एनएसडीसी मान्यताप्राप्त चार शॉर्ट-टर्म स्किलिंग कार्यक्रमांची लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

मॅजिकचे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद कोकिळ यांनी अटल टिंकरिंग लॅब्सच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच नवोन्मेष आणि उद्योजकतेची बीजे रुजविण्याची गरज व्यक्त केली. जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत सुमारे १२ अटल टिंकरिंग लॅब्स उभारण्यासाठी मॅजिकने पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधील १४६ अटल टिंकरिंग लॅब्सच्या समन्वयाची जबाबदारी मॅजिककडे सोपविण्यात आली असून, संबंधित लॅब्सशी संपर्क सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी वस्तू केवळ वापरण्याऐवजी त्या उघडून पाहाव्यात, त्यामागील तंत्रज्ञान समजून घ्यावे आणि प्रयोगातून शिकावे, यासाठी प्रत्येक अटल टिंकरिंग लॅबमध्ये 'क्युरिऑसिटी कॉर्नर' विकसित करण्याची संकल्पनाही त्यांनी मांडली. कार्यक्रमाला मॅजिकचे संचालक सुनील रायथत्ता, रितेश मिश्रा, अनुज बन्सल, अतुल केसकर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालना), अभिजीत अल्टे (प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना), तृप्ती भोपे (उपप्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना), गणेश चिमणकर (सहाय्यक आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, जालना) यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मकरंद भालेराव यांनी केले, तर आभार सीईओ मकरंद कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राघवेंद्र कुलकर्णी, देविदास राठोड, कृष्णा शिंदे आणि आविष्कार पाटील यांनी प्रयत्न केले.

# ग्रंथालये बंद होणे म्हणजे वाचन संस्कृतीसमोरील मोठे आव्हान

महाराष्ट्राला संत, साहित्यिक, विचारवंत आणि समाजसुधारकांची समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, साने गुरुजी यांच्यासारख्या अनेक महान व्यक्तींनी समाजाच्या वैचारिक जडणघडणीत वाचन आणि ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. पुस्तक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून माणसाला विचार करायला शिकवणारे, प्रश्न विचारण्याची ताकद देणारे आणि समाजाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी देणारे माध्यम आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची घटती संख्या ही केवळ एका संस्थेची समस्या नसून आपल्या वाचन संस्कृतीसमोरील गंभीर आव्हान आहे.

राज्य ग्रंथालय संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रातील ९९३ मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये बंद झाली आहेत, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. २०२२ मध्ये राज्यात १२ हजार १४९ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत होती. त्यानंतर ही संख्या सातत्याने कमी होत गेली आणि २०२४ अखेरपर्यंत कार्यरत ग्रंथालयांची संख्या सुमारे ११ हजार १५० वर आली. आकडेवारीकडे केवळ संख्येच्या दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक बंद झालेले ग्रंथालय म्हणजे त्या परिसरातील विद्यार्थी, तरुण, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, साहित्यप्रेमी आणि सामान्य वाचकांसाठी उपलब्ध असलेले एक ज्ञानकेंद्र कमी होणे होय.

**ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे लोकशाही केंद्र**

सार्वजनिक ग्रंथालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी खुले असते. आर्थिक परिस्थिती चांगली असो किंवा सामान्य असो, प्रत्येकाला तेथे पुस्तके वाचण्याची संधी मिळते. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालये अत्यंत महत्त्वाची आहेत. महागडी पुस्तके विकत घेणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य नसते. अशा वेळी ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, वर्तमानपत्रे आणि नियतकालिके त्यांच्या शिक्षणाला मोठी मदत करतात.

अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या मदतीने स्पर्धा परीक्षांची तयारी केली आहे. काहींनी अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले, तर काहींनी साहित्य, पत्रकारिता, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे ग्रंथालय बंद होणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या एका महत्त्वाच्या दारावर कुलूप लागण्यासारखे आहे.

**बंद होण्यामागे अनेक कारणे**

सार्वजनिक ग्रंथालये बंद होण्यामागे एकच कारण नाही. ग्रामीण भागातील अनेक ग्रंथालयांना अपुरी आर्थिक मदत, वाढता भाडे व देखभाल खर्च, वीजबिल, कर्मचाऱ्यांचे मानधन, नवीन पुस्तकांची वाढती किंमत आणि आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव यांचा सामना करावा लागतो. आजच्या काळात केवळ कपाटांमध्ये पुस्तके ठेवणे पुरेसे राहिलेले नाही. वाचकांना संगणक, इंटरनेट, डिजिटल संदर्भसाहित्य, ई-बुक्स आणि ऑनलाइन माहितीचीही गरज आहे. मात्र अनेक ग्रंथालयांमध्ये संगणकीकरण आणि इंटरनेटची सुविधा अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. परिणामी आधुनिक पिढीतील अनेक तरुण ग्रंथालयांपासून दूर जात आहेत. दुसरीकडे, मोबाईल आणि सोशल मीडियामुळे माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे पुस्तक हातात घेऊन शांतपणे वाचण्याची सवय कमी होत असल्याचे चित्र दिसते. माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी माहितीचे आकलन, विश्लेषण आणि चिकित्सक विचार करण्यासाठी सखोल वाचनाची गरज कायम आहे. सोशल मीडियावरील छोट्या संदेशांमधून मिळणारी माहिती आणि पुस्तकातून मिळणारे सखोल ज्ञान यामध्ये मोठा फरक आहे.

**डिजिटल युगामुळे ग्रंथालयांचे महत्त्व कमी झाले का?**

डिजिटल युगामुळे ग्रंथालयांचे स्वरूप बदलण्याची गरज निर्माण झाली आहे; मात्र त्यांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, डिजिटल साधनांचा योग्य वापर करून ग्रंथालये अधिक प्रभावी बनवता येऊ शकतात.

आज ग्रंथालयात पारंपरिक पुस्तकांसोबत ई-बुक्स, डिजिटल संग्रह, ऑनलाइन नियतकालिके, स्पर्धा परीक्षांचे डिजिटल साहित्य, शैक्षणिक व्हिडिओ आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देता येतात. विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, शैक्षणिक माहिती शोधणे आणि विविध परीक्षांसाठी डिजिटल अभ्याससाहित्य मिळवून देणे शक्य आहे.

म्हणून मोबाईल आणि इंटरनेट हे ग्रंथालयांचे प्रतिस्पर्धी न मानता त्यांना ग्रंथालयाच्या ज्ञानप्रसाराचे आधुनिक साधन बनवणे आवश्यक आहे. 'पुस्तकालय ते डिजिटल ज्ञानालय' असा प्रवास करण्याची हीच योग्य वेळ आहे.

**वाचनाची सवय कमी होणे धोकादायक**

आज अनेक मुलांच्या आणि तरुणांच्या हातात मोबाईल आहे; परंतु त्याच हातात पुस्तक किती वेळ असते, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सततच्या मोबाईल वापरामुळे एकाग्रतेने वाचण्याची सवय कमी होत आहे. सोशल मीडिया, मनोरंजनाचे विविध पर्याय आणि झटपट माहितीच्या संस्कृतीमुळे सखोल वाचनासाठी वेळ देण्याची प्रवृत्ती कमी होत आहे.

वाचन माणसाला केवळ माहिती देत नाही, तर त्याची भाषा समृद्ध करते, कल्पनाशक्ती वाढवते, विचारशक्ती विकसित करते आणि संवेदनशीलता वाढवते. चांगले साहित्य वाचणारा समाज अधिक चिकित्सक, संवेदनशील आणि विवेकी बनतो. त्यामुळे वाचनाची सवय कमी होणे ही भविष्यातील पिढीच्या बौद्धिक विकासासाठी चिंतेची बाब आहे.

**शासनाची भूमिका महत्त्वाची**

ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याची घोषणा सकारात्मक पाऊल आहे. मात्र अनुदान वाढवण्याबरोबरच त्याचा योग्य वापर आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ गरजू ग्रंथालयांपर्यंत पोहोचतो आहे का, याचीही नियमित तपासणी होणे आवश्यक आहे.

ग्रंथालयांना केवळ इमारत आणि पुस्तके देऊन काम पूर्ण होत नाही. तेथे प्रशिक्षित कर्मचारी, वाचकांसाठी चांगले वातावरण, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, बसण्याची सुविधा, संगणक, इंटरनेट आणि आधुनिक संदर्भसाहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे.

विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील ग्रंथालयांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. ज्या ग्रंथालयांमध्ये वाचकसंख्या वाढविण्याची क्षमता आहे, अशा ग्रंथालयांना अतिरिक्त प्रोत्साहन दिले पाहिजे.

**ग्रंथालयांमध्ये वाचन चळवळ उभी राहावी**

ग्रंथालये केवळ पुस्तके घेऊन वाचण्याची ठिकाणे न राहता ती स्थानिक सांस्कृतिक आणि वैचारिक केंद्रे बनली पाहिजेत. पुस्तक प्रदर्शन, लेखकांशी संवाद, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक चर्चा, व्याख्याने आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करता येतील. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी आपला अनुभव तरुणांपर्यंत पोहोचवावा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनासाठी प्रोत्साहित करावे आणि पालकांनी मुलांच्या हातात पुस्तक देण्याची सवय लावावी. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ग्रंथालये यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास वाचन चळवळीला मोठी चालना मिळू शकते.

**बंद ग्रंथालये पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न हवेत**

ज्या ग्रंथालयांना आर्थिक किंवा व्यवस्थापनाच्या कारणामुळे बंद व्हावे लागले आहे, त्यांचा स्वतंत्र आढावा घेणे आवश्यक आहे. शक्य असलेल्या ग्रंथालयांना स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, उद्योग आणि नागरिकांच्या सहकार्याने पुन्हा सुरू करता येईल. 'एक गावएक ग्रंथालय' किंवा 'प्रत्येक गावात सुसज्ज वाचनालय' ही संकल्पना व्यापक पातळीवर राबविण्याची गरज आहे. समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी वाढदिवस, स्मृतिदिन किंवा इतर कार्यक्रमांवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी ग्रंथालयांना पुस्तके आणि आवश्यक साहित्य देण्याची संस्कृती निर्माण केली तर त्याचा मोठा फायदा होऊ शकतो.

**वाचकांनीही आपली जबाबदारी ओळखावी**

ग्रंथालये टिकवण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. वाचकांचीही तितकीच जबाबदारी आहे. ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचणे, पुस्तकांची काळजी घेणे, नवीन पुस्तकांची मागणी करणे आणि इतरांना वाचनासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. प्रत्येक कुटुंबाने महिन्यात किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प केला, प्रत्येक शाळेने नियमित वाचन तास घेतला आणि प्रत्येक गावाने आपल्या ग्रंथालयाला सक्रिय केले तर वाचन संस्कृतीला नवसंजीवनी मिळू शकते.

**वाचन संस्कृती जपणे ही सामूहिक जबाबदारी**

महाराष्ट्रात ९९३ सार्वजनिक ग्रंथालये बंद होणे ही भविष्यासाठी धोक्याची घंटा समजली पाहिजे. मात्र या परिस्थितीकडे केवळ निराशेने पाहण्याची गरज नाही. योग्य नियोजन, पुरेसा निधी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि समाजाचा सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीला पुन्हा बळकटी देता येऊ शकते.

ग्रंथालये ही समाजाची वैचारिक मंदिरे आहेत. त्यांच्या दारावर कुलूप लागणे म्हणजे केवळ एका इमारतीचे दार बंद होणे नव्हे, तर ज्ञानाकडे जाणारा एक मार्ग बंद होणे आहे. त्यामुळे बंद पडणारी ग्रंथालये वाचवणे आणि नव्या पिढीला पुस्तकांशी जोडणे ही आजची अत्यंत महत्त्वाची सामाजिक गरज आहे. मोबाईलच्या पडद्यापलीकडेही एक मोठे जग आहे आणि ते जग पुस्तकांच्या पानांमध्ये दडलेले आहे. त्या पानांशी नव्या पिढीची मैत्री झाली तरच महाराष्ट्राची समृद्ध वाचन परंपरा पुढे चालू राहील. ग्रंथालये वाचली तर वाचन संस्कृती वाचेल; वाचन संस्कृती वाचली तर समाजाची वैचारिक समृद्धी आणि लोकशाहीची जाणीव अधिक मजबूत होईल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# व्यापाऱ्यांच्या सीसी कर्जावरील व्याज सरकारने भरावे

## दुष्काळाच्या झळा व्यापाऱ्यांनाही; लहान-मध्यम व्यापाऱ्यांना दिलासा देण्याची गरज

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने त्याची झळ केवळ शेतकरी वर्गालाच नव्हे, तर लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. व्यवसायातील उलाढाल मंदावल्याने दैनंदिन खर्च भागविणेही व्यापाऱ्यांसाठी कठीण होत आहे. त्यामुळे दहा लाख रुपयांपर्यंत कॅश क्रेडिट (सीसी) मर्यादा असलेल्या अथवा एक कोटी रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल असलेल्या छोट्या व्यापाऱ्यांच्या सीसी कर्जावरील व्याज पुढील पावसाळ्यापर्यंत सरकारने भरावे, अशी मागणी जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्यकारी सचिव तथा मराठवाडा चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष शामसुंदर लोया यांनी केली.



महाराष्ट्र चेंबर, मराठवाडा चेंबर आणि वैजापूर व्यापारी महासंघाच्या वतीने रविवार, ४ ऑक्टोबर रोजी वैजापूर येथे मराठवाडा व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दोन्ही चेंबरच्या पदाधिकाऱ्यांसमोर लोया यांनी जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने व्यापारी वर्गाच्या विविध मागण्या मांडल्या.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते तथा महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंग बापू पवार होते. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले.

दुष्काळाच्या काळात सरकार शेतकरी वर्गाला विविध माध्यमातून मदतीचा हात देते. त्याच धर्तीवर छोट्या व मध्यम व्यापाऱ्यांनाही सरकारने मदत करणे गरजेचे आहे, असे लोया यांनी सांगितले. व्यापारी वर्ग सरकारला कर वसूल करून देतो तसेच स्वतःही मोठ्या प्रमाणात कर भरतो. मग व्यापारी वर्ग केवळ कर भरण्यासाठीच आहे काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दुष्काळामुळे बाजारपेठेतील उलाढाल कमी झाली असून व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत छोट्या व्यापाऱ्यांना कर्जाचा व्याजभार पेलणे अवघड होत आहे. त्यामुळे सरकारने त्यांच्या सीसी कर्जावरील व्याजाचा भार उचलून व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यूपीआयवरील कर रद्द करण्याची मागणी केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारावर लावलेला ०.४ टक्के कर रद्द करावा. तसेच जीएसटी लागू करताना 'वन नेशन, वन टॅक्स' अशी भूमिका मांडण्यात आली होती. मात्र महाराष्ट्रातील व्यवसाय कर अद्याप कायम असल्याने तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पूर्वी व्यापारी वर्गातून निवडणुकीद्वारे तीन प्रतिनिधी निवडून येत होते. मात्र आता दोन प्रतिनिधी निवडण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर निवडून आलेल्या व्यापारी प्रतिनिधींना सभापतीपदासाठी निवडणूक लढविण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. हे निर्बंध हटवून तीन व्यापारी प्रतिनिधी निवडून देण्याची आणि त्यांना सभापतीपदासाठी निवडणूक लढविण्याची परवानगी देणारा कायदा करावा, अशी मागणीही लोया यांनी केली.

व्यावसायिक प्रतिष्ठानांवर बसविण्यात आलेल्या सौर ऊर्जा यंत्रणेतून निर्माण होणाऱ्या विजेवर आकारण्यात येणारा ग्रिड सपोर्टिंग चार्ज रद्द करावा, अशी मागणी त्यांनी केली. अथवा भविष्यात नव्याने बसविण्यात येणाऱ्या सौर यंत्रणांनाच हा चार्ज लागू करावा. सरकार अथवा महावितरणने सौर ऊर्जेची धोरणे सातत्याने बदलत राहिल्यास हरित ऊर्जेच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सरकारने याची गांभीर्याने दखल घ्यावी, असेही लोया यांनी स्पष्ट केले.

या व्यापार परिषदेस मराठवाड्यातील सुमारे ७०० व्यापारी प्रतिनिधी उपस्थित होते. मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष सुरेंद्र रोहिदासनी, वरिष्ठ उपाध्यक्ष शामसुंदर लोया, माजी अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा, महासचिव संदीप लाहोटी, वैजापूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष शांतीलाल पहाडे यांच्यासह दोन्ही चेंबरचे पदाधिकारी उपस्थित होते.

**व्यापाऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका**

**दुष्काळी परिस्थितीत सरकारने छोट्या शेतकऱ्यांप्रमाणेच छोट्या व्यापाऱ्यांनाही मदतीचा हात द्यायला हवा. 'कोणी यावे, टपली मारून जावे' अशी गत व्यापारी वर्गाची झाली आहे. व्यापारी वर्गाच्या सहनशीलतेचा अंत सरकारने पाहू नये. व्यापाऱ्यांच्या ज्या काही रास्त मागण्या आहेत, त्या सरकारने मान्य करून त्यांना मदतीचा हात पुढे करावा, एवढीच सरकारकडे कळकळीची विनंती आहे.**

**शामसुंदर लोया**
**वरिष्ठ उपाध्यक्ष, मराठवाडा चेंबर तथा कार्यकारी सचिव, जालना जिल्हा व्यापारी महासंघ**

# देऊळगाव राजा पोलीस ठाण्याच्या गेटवरच दोन गट भिडले; नगरसेवकासह दोघांचा मृत्यू; जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल..

**जालना - प्रतिनिधी**

देऊळगाव राजा येथील आठवडी बाजार परिसरात रविवारी आयोजित करण्यात आलेल्या कव्वालीच्या कार्यक्रमात लहान मुलांच्या किरकोळ भांडणावरून सुरू झालेल्या वादाचे सोमवारी सायंकाळी रक्तरंजित संघर्षात रूपांतर झाले. वाद मिटवण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या दोन गटांमध्ये पोलीस ठाण्याच्या गेटसमोरच जोरदार हाणामारी झाली. या घटनेत शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक शेख अनवर शेख अली आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पराभूत उमेदवार आरीफ खान हरून खान यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. ४) देऊळगाव राजा आठवडी बाजार परिसरात रात्री कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान लहान मुलांमध्ये किरकोळ कारणावरून भांडण झाले. या भांडणाचा वाद पुढे दोन गटांमध्ये पोहोचला.

दरम्यान, सोमवारी (दि. ५) सायंकाळी सुमारे सहा वाजता दोन्ही गटांतील नागरिक वाद मिटवण्यासाठी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात आले होते. मात्र, पोलीस ठाण्यात एकमेकांशी बोलताना पुन्हा वाद निर्माण झाला. त्यानंतर पोलीस ठाण्याच्या गेटसमोरच दोन्ही गट आमनेसामने आले आणि त्यांच्यात जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत गंभीर जखमी झालेल्या दोघांना नागरिकांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. शेख अनवर शेख अली यांना उपचारासाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. तर आरीफ खान हरून खान यांना देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; त्यांचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच बुलढाणा पोलीस तसेच देऊळगाव राजा पोलीस जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, शेख अनवर शेख अली यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयातील पीएम रूममध्ये ठेवण्यात आला असून आज शवविच्छेदना करून नातेवाईकांच्या सुप्रीत करण्यात येणार तर दुसऱ्या मृतदेहाची प्रक्रिया देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णालयात सुरू आहे. पोलीस ठाण्याच्या गेटसमोरच दोन गटांमध्ये झालेल्या या हिंसक संघर्षामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेमागील नेमके कारण, हाणामारीत सहभागी असलेले व्यक्ती आणि या प्रकरणातील पुढील कायदेशीर कारवाई याबाबत पोलीस तपास सुरू आहे.





राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांची मुंबई येथील जंजिरा शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. तुकाराम हे पुस्तक भेट देऊन सत्कार करताना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम. या प्रसंगी विद्यार्थी व शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली...

# गल्हाटी मध्यम प्रकल्प कोरडाठाक; १५ ते २० गावांवर पाणीटंचाईचे संकट..

## परतीचा पाऊसही हुलकावणी; रब्बी हंगामासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता..

**जालना । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील बारसवाडा येथील गल्हाटी मध्यम प्रकल्प यंदा पावसाअभावी ऑक्टोबर महिन्यातच पूर्णतः कोरडा पडला आहे. त्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या सुमारे १५ ते २० गावांवर पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता असून, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



गल्हाटी मध्यम प्रकल्पातून परिसरातील गावांची पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासोबतच शेतीसाठी सिंचन आणि जनावरांसाठी पाण्याचा आधार मिळतो. मात्र, यंदा पावसाने पाठ फिरवल्याने प्रकल्पात अपेक्षित पाणीसाठा होऊ शकला नाही. परतीच्या पावसाचीही प्रतीक्षा कायम राहिल्याने प्रकल्प कोरडाठाक पडला आहे.

प्रकल्पात पाणी उपलब्ध झाले असते तर शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिके घेण्याची काहीशी आशा होती. मात्र, पावसाअभावी खरीप हंगामावर परिणाम झाल्यानंतर आता रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. पिकांसोबतच जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. गल्हाटी प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांमध्ये आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने आतापासूनच संभाव्य पाणीटंचाईचा आढावा घेऊन टँकरसह आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

शेतकरी सुरेश काळे आणि सुभाष भोईटे यांनी सांगितले की, गल्हाटी प्रकल्पावर परिसरातील अनेक गावांची पाणी आणि शेतीची भिस्त आहे. यंदा प्रकल्प पूर्णपणे कोरडा पडल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पाणी उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

# बदनापूर IIMSRमध्ये पूरक आहार समुपदेशन व प्रात्यक्षिक केंद्र सुरू

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते उद्घाटन; बालकांच्या पहिल्या १००० दिवसांच्या पोषणावर भर

**बदनापूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पोषण महिन्याच्या निमित्ताने JIIUच्या Indian Institute of Medical Science & Research (IIMSR) नूर हॉस्पिटल, वरुडी, ता. बदनापूर येथे 'पूरक आहार समुपदेशन व प्रात्यक्षिक केंद्र' सुरू करण्यात आले. या केंद्राचे उद्घाटन जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.



सहा महिन्यांनंतर बालकांना पूरक आहाराची सुरुवात कशी करावी, वयानुसार आहाराचे प्रमाण व वारंवारता किती असावी, आहारामध्ये विविधता कशी राखावी तसेच आठ प्रमुख अन्नगटांचा समावेश कसा करावा, याबाबत माता व कुटुंबीयांना या केंद्राच्या माध्यमातून नियमित समुपदेशन देण्यात येणार आहे. स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होणाऱ्या पौष्टिक पदार्थांचा बालकांच्या आहारात योग्य पद्धतीने वापर कसा करावा, याचेही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. बालकांसाठी उपयुक्त विविध पौष्टिक पावडरपासून तयार होणाऱ्या पाककृतींच्या तयारीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक हे या केंद्राचे प्रमुख वैशिष्ट्य राहणार आहे. त्यामुळे केवळ आहारविषयक माहिती न देता ती प्रत्यक्ष कृतीत कशी आणता येईल, याबाबत पालकांना व्यवहार्य मार्गदर्शन मिळणार आहे.

**पहिल्या १००० दिवसांचे महत्त्व**

उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बालकांच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांच्या महत्त्वावर भर दिला. बालकाच्या वाढीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी या कालावधीत योग्य पोषण, आरोग्यसेवा आणि पालकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्र (पान २ वर)

# जालन्याच्या डॉ. मनोज गावंडे यांना 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान व तंत्रज्ञान पुरस्कार' जाहीर

## उत्कृष्ट संशोधनाची दखल; एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्राने होणार गौरव

**जालना । प्रतिनिधी**

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी), मुंबई मराठवाडा कॅम्पस येथील प्राध्यापक डॉ. मनोज गावंडे यांना सन २०२६ चा प्रतिष्ठित 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान व तंत्रज्ञान पुरस्कार' जाहीर झाला आहे. विद्यापीठांच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागांमध्ये केलेल्या उत्कृष्ट आणि उच्च दर्जाच्या संशोधनाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारामुळे जालना शहराच्या वैज्ञानिक आणि शैक्षणिक क्षेत्राच्या लौकिकात भर पडली आहे.



या प्रतिष्ठित पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. ६१ व्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनाचे उद्घाटन सत्र २६ डिसेंबर रोजी जळगाव येथे होणार असून, याच कार्यक्रमात डॉ. गावंडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

डॉ. गावंडे यांचे संशोधन शाश्वत रसायनशास्त्र, नॅनोकॅटॅलिसिस आणि सिंगल-ॲटम कॅटलिस्ट्स या विज्ञानातील महत्त्वपूर्ण आणि आधुनिक क्षेत्रांवर केंद्रित आहे. पर्यावरणपूरक कच्चा माल तसेच नाविन्यपूर्ण नॅनोमटेरिअल्स विकसित करण्याच्या दिशेने त्यांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनातून विकसित करण्यात आलेल्या संकल्पना व नॅनोमटेरिअल्सचा उपयोग प्रगत उत्प्रेरक, फोटोकॅटॅलिसिस तसेच ऊर्जा क्षेत्रातील विविध अनुप्रयोगांसाठी होत आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने या संशोधनाला विशेष महत्त्व आहे. डॉ. गावंडे यांच्या संशोधन कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेण्यात आली आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या प्रतिष्ठित यादीत सातत्यपूर्ण आणि प्रभावी संशोधक म्हणून त्यांची नोंद असल्याचे सांगण्यात आले आहे. डॉ. गावंडे यांनी आतापर्यंत २१५ हून अधिक संशोधनपत्रे प्रकाशित केली असून, त्यांच्या संशोधन कार्याला मोठ्या प्रमाणात संदर्भ मिळाले आहेत. त्यांच्या संशोधनाचा व्यापक प्रभाव त्यांच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक योगदानाची साक्ष देतो. आयसीटीच्या मराठवाडा कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या डॉ. मनोज गावंडे यांना मिळालेला हा सन्मान जालना (पान २ वर)

# पाण्याचा अपव्यय केल्यास ५ ते २५ हजारांचा दंड; जालना मनपाचा नागरिकांना इशारा

## गळती, अनधिकृत नळजोडणी व विद्युत मोटारीच्या वापरावर कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने आणि योग्य पद्धतीने वापर करण्याचे आवाहन जालना महानगरपालिकेने नागरिकांना केले आहे. पाणीपुरवठा झाल्यानंतर आवश्यक तेवढे पाणी भरून झाल्यावर नळ तात्काळ बंद करावा, तसेच पाणी रस्त्यावर, नालीमध्ये किंवा इतर ठिकाणी वाहून जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे मनपाने स्पष्ट केले आहे. पाण्याचा अपव्यय, गळती, अनधिकृत नळजोडणी तसेच मनपाच्या जलवाहिनीवरून थेट विद्युत मोटारद्वारे पाणी खेचण्याचे प्रकार आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

जालना शहरात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये. पाणी भरल्यानंतर नळ बंद करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. घरगुती नळांना योग्य दर्जाच्या तोट्या बसवून पाण्याची गळती रोखावी, असे आवाहनही महानगरपालिकेने केले आहे.

घरगुती नळ जोडणी, नळ, तोट्या तसेच घरातील अंतर्गत जलवाहिन्यांमध्ये गळती असल्यास ती तातडीने दुरुस्त करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित सर्व दुरुस्तीची कामे १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करून घ्यावीत, असे मनपाने जाहीर केले आहे. या मुदतीनंतरही पाण्याची गळती अथवा पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

ज्या भागात महानगरपालिकेमार्फत पुरेसा पाणीपुरवठा केला जातो, त्या ठिकाणी मनपाच्या जलवाहिनीवरून थेट पाणी खेचण्यासाठी विद्युत मोटार किंवा पंपाचा वापर करू नये, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. जलवाहिनीवरून थेट मोटार लावून पाणी खेचल्याने परिसरातील इतर नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारांवर मनपा प्रशासन लक्ष ठेवणार आहे. तसेच शहरातील अनधिकृत नळ जोडण्या तात्काळ अधिकृत करून घ्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या जलवाहिनीत परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची छेडछाड, जोडणी किंवा फेरफार करू नये. अशा प्रकारचे अनधिकृत कृत्य आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुण्यासाठी किंवा रस्ते स्वच्छ करण्यासाठी करून मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांनाही मनपाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. रस्त्यावर वाहने धुणे, घरासमोरील रस्ता पाण्याने धुणे अथवा कोणत्याही अन्य प्रकारे पाण्याचा अपव्यय करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पाणी बचतीच्या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्यांवर टप्प्याटप्प्याने दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा मनपाने दिला आहे. त्यानुसार, पहिल्यांदा उल्लंघन आढळल्यास ५ हजार रुपये दंड, दुसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास १० हजार रुपये दंड, तिसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास २५ हजार रुपये दंड अशी कारवाई करण्यात येणार आहे. वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध केवळ दंडात्मक कारवाईपुरते मर्यादित न राहता फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करताना पाण्याचा अपव्यय रोखणे हे मनपापुढील मोठे आव्हान आहे. त्यामुळे केवळ प्रशासनाच्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. नळ सुरू ठेवून पाणी वाहू देणे, घरगुती जलवाहिनीतील गळतीकडे दुर्लक्ष करणे, मोटारीने थेट जलवाहिनीतून पाणी खेचणे किंवा अनधिकृत जोडणी करणे यामुळे संपूर्ण परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे नागरिकांनी 'पाणी आहे तरच उद्या आहे' या भावनेतून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, गळती तातडीने दुरुस्त करावी आणि महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन जालना महानगरपालिकेने केले आहे.

# सेवा संकल्प अभियान : नशामुक्त भारताचा संदेश; अमृतच्या योजनांचे मार्गदर्शन



**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आणि नवयुग नशामुक्ती केंद्र, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात सेवा संकल्प अभियान अंतर्गत 'अमृत संस्थेच्या योजना व नशामुक्त भारत' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांना अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, व्यावसायिक, कौशल्यविकास आणि रोजगारक्षम योजनांची माहिती मिळावी, तसेच नशामुक्त जीवनशैलीबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अमृत संस्थेचे जालना जिल्हा व्यवस्थापक नितीन खेकाळे यांनी विद्यार्थ्यांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती दिली. शिक्षणासोबत कौशल्यविकास आणि उद्योजकतेकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. अमृतच्या योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याला योग्य दिशा द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

नवयुग नशामुक्ती केंद्राचे समुपदेशक संजय थोरात यांनी 'नशामुक्त भारत' या विषयावर मार्गदर्शन केले. नशेमुळे आरोग्य, शिक्षण, कुटुंब आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती त्यांनी दिली. तरुणांनी नशेपासून दूर राहून निरोगी व सकारात्मक जीवनशैली स्वीकारावी, तसेच इतरांमध्येही नशामुक्तीबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके होत्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरकडेही लक्ष द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठ्ठल गाडेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गोवर्धन खेडकर यांनी केले, तर आभार डॉ. दादासाहेब गिन्हे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मॅजिक-आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटरचा प्रथम वर्धापनदिन उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**

मॅजिक-आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटरचा प्रथम वर्धापनदिन तसेच 'मॅजिक आयडिया हॅकाथॉन २०२६' चा ग्रँड फायनल उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगरचे सहसंचालक प्रदीप दुर्गे यांची प्रमुख उपस्थिती होती.



हॅकाथॉनमध्ये एकूण ७५ प्रकल्पांमधून अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या २५ प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये आयटीआय गटातून वेस्ट ऑइल कुकिंग, तर नॉन-आयटीआय गटातून ॲग्रोनोवा यांनी विजेतेपद पटकावले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी मॅजिक-आयटीआयच्या प्रगतीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी उपलब्ध संसाधने, मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाचा अधिकाधिक लाभ घेत जालना तसेच मराठवाड्याला कौशल्य आणि नवोन्मेषाचे केंद्र बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मॅजिक-आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून आतापर्यंत ११ स्टार्टअप्स उभे राहिले असून, मॅजिकच्या एकूण परिसंस्थेत १८५ स्टार्टअप्सशी संबंधित उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्यात रोजगारनिर्मितीची मोठी गरज असून, त्यासाठी उद्योग आणि उद्योजक निर्माण करणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सहसंचालक प्रदीप दुर्गे यांनी विद्यार्थ्यांनी आयटीआयच्या शिक्षणाकडे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता उद्योजकतेच्या दृष्टीने पाहावे, असे आवाहन केले. 'नोकरी मागणारे नव्हे, नोकरी देणारे बना,' असा संदेश त्यांनी दिला. पीएम सेतू योजनेअंतर्गत जालना आयटीआयचा क्लस्टरमध्ये सहभाग असून, त्यातून कौशल्य विकासाच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनुज बन्सल यांनी मॅजिकतर्फे जालना व मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी अटल टिंकरिंग लॅब्स, क्युरिऑसिटी कॉर्नर, शॉर्ट-टर्म स्किलिंग कोर्सेस आणि मेंटरिंग अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार न करता 'आयडिया टू इन्कम टॅक्स' या संकल्पनेतून स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मॅजिकमार्फत विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या तसेच स्टार्टअप्सच्या कल्पनांना आर्थिक (पान २ वर)

# सेवा दीप यात्रास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील जनसेवेच्या २५ वर्षपूर्तीनिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे देशभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सेवा संकल्प अभियाना चा भाग म्हणून जालना शहरात बुधवारी दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात सेवा दीप यात्रा व भव्य सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केले आहे.



द्यसेवा संकल्प अभियानाच्या पूर्वतयारीसाठी भाजपा जालना महानगरच्या वतीने मंगळवारी (दि. ६) भाजपा जिल्हा कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थित होती. या वेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले, की पंतप्रधान मोदी यांच्या जनसेवेचा हा २५ वर्षांचा प्रवास देशासाठी ऐतिहासिक आहे. या क्षणाचे औचित्य साधून जालना शहरात सेवा दीप यात्रा व भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेदरम्यान पंतप्रधान मोदी हे प्रक्षेपणाद्वारे (व्हर्च्युअल माध्यमातून) उपस्थित जनसमुदायाला संबोधित करणार आहेत.

मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ वर्षांत देशाने विकास, सुशासन, पायाभूत सुविधा, गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी आणि आत्मनिर्भरता या क्षेत्रांत मोठी झेप घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या राष्ट्रसेवेच्या या २५ वर्षांचा गौरव करण्याबरोबरच विकसित भारत घडविण्याचा संकल्प करण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, गटनेते महेश निकम, मंडळ अध्यक्ष मोहन राऊत, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, रमेश गौरक्षक, नगरसेवक महावीर ढक्का, विमलताई आगलावे, संध्या देठे, सुलोचना गोर्डे, सखुबाई पणबिसरे, स्नेहा जोशी, पुष्पा मेहेत्रे, शशिकांत घुगे, विजय कामड, सुजित जोगस, सुहास मुंडे, अनिल सरकटे, मजहर सय्यद समद, शिवराज नारीयलवाले, बाबुराव पवार, जीवन सले, प्रभुलाल गोमतीवाले, शितलप्रसाद पांडे, सिद्धेश्वर हाजबे, महादेव कावळे, ज्ञानेश्वर उगले, बद्रीनाथ भसांडे, ज्ञानेश्वर राठोड, राजाराम जाधव, सुभाष मामा सले, रोषण चौधरी, विजय पवार, बापू साळवे, अजित मानधनी, आकाश देशमाने, रोहित खोडवे, सतीश नाईकवाडे, कृष्ण गायके, उद्धव ढवळे, नागेश अंभोरे, नारायण मोहिते, सतीश दाभाडे, राहुल यादव, बद्रीनाथ वाघ, गुलाब पणबिसरे,

पंकज किल्लेदार, हरिभाऊ गोरे, शिवराज जाधव, देवलाल काकडे, मनोज इंगळे, रोहित भूरेवाल, तुकाराम बखळे, गणेश वाघमारे, शाम उगले, गौरव गोधेकर आदींची उपस्थिती होती. या ऐतिहासिक कार्यक्रमास सर्वांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.